www.pudhari.com

# पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

ठाणे **

शुक्रवार, ८ जून २०१२ । स्थापना वर्ष ७४ । मुंबई आवृत्ती वर्ष ४ थे । मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, सोलापूर, बेळगाव, गोवा येथून एकाचवेळी प्रसिद्ध

पोटनिवडणुकीच्या पोटात काय?

अतिशय लवचिक काचेची निर्मिती

विश्वसंचार

आता 'हलकट जवानी'!

विश्वसंचार



मधुर भांडारकर
जवानी' म्हणत
दोन दिवसांपूर्वी

# ठाणे खाडीकिनारी वसणार नवे शहर

## मुख्यमंत्र्यांचा हिरवा कंदील; आनंदनगर ते गायमुख नव्या बायपास रस्त्याला मंजुरी

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाणे खाडीचे सुशोभीकरण व संवर्धन, खाडीच्या पूर्वेला आनंदनगर-खारबा (भिवंडी) ते गायमुख असा सुमारे ३० कि.मी. लांबीचा पर्यायी रस्ता आणि खाडीकिनाऱ्याच्या पूर्वेला सुमारे १०० चौरस कि.मी. क्षेत्रफळामध्ये प्रस्तावित करण्यात आलेले नवीन शहर अशा ठाणे खाडीकिनारा विकास प्रकल्पाला गुरुवारी राज्याचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रथमदर्शनी हिरवा कंदील दाखवला.

ठाणे खाडीकिनारा विकास प्रकल्प आराखड्याचे महापालिका आयुक्त आर.ए.राजीव आणि प्रकल्पाचे सल्लागार बेल्जियमस्थित ने-पॉलिसन कंपनीचे क्रीस पोलिसन यांनी मुख्यमंत्री चव्हाण यांच्यासमोर सादरीकरण केले.

खाडीच्या पूर्व किनाऱ्यालगत नवीन शहर निर्मितीच्या संकल्पनेचा नगरविकास आराखड्यानुसार सिडको आणि एमएमआरडीए यांनी अभ्यास करून योग्य ती कारवाई करावी आणि हा प्रकल्प सीआरझेडकडे मान्यतेसाठी पाठवावा, असे निर्देश देऊन मुख्यमंत्र्यांनी प्रकल्पाला अनुकूलता दर्शवली.

या प्रकल्पामुळे ठाण्यातच नाही तर राज्यात विकासाचे नवे मॉडेल निर्माण होणार असून हा बहुमान ठाणे महापालिकेला मिळणार आहे. ठाणे बायपास, शॅलो वॉटर पार्क व वॉटर फ्रंट डेव्हलपमेंट प्रकल्प फक्त बायपास म्हणून विकसित न करता शहराअंतर्गत आणि शहराबाहेरून येणाऱ्या वाहतुकीस त्याचा कसा वापरता येईल यावर विचार व्हावा. या प्रकल्पामुळे ठाणे शहरातील ८० टक्के वाहतूक शहराबाहेरून जाण्यास मदत होईल. त्यामुळे शहरातील प्रदूषण, अपघातांचे प्रमाण कमी होऊ शकेल, असे यावेळी राजीव यांनी सांगितले.

सद्यस्थितीत रोज सुमारे ५ लाख वाहने ठाण्यातून जातात. त्यात १० हजार अवजड वाहने असतात. या वाहनांमुळे शहरात वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होतोच; पण वाढते अपघात आणि प्रदूषणाचा विळखाही ठाण्याला पडत आहे. या समस्येवर पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यासाठी पालिकेने २ जानेवारी ने- पॉलिसन इंजिनीअर्स अॅण्ड आर्किटेक्ट या आंतरराष्ट्रीय सल्लागार संस्थेची नियुक्ती केली होती. या संस्थेच्या तज्ज्ञांनी महापालिका आयुक्त व इतर अधिकाऱ्यांशी सातत्याने चर्चा करून ४ जून रोजी आपला आराखडा महापालिकेस सादर केला. काही बदल करून आयुक्तांनी तो आराखडा गुरुवारी मुख्यमंत्र्यांसमोर सादर केला. मुख्यमंत्री चव्हाण यांनी त्यास हिरवा कंदील दाखवताना प्रकल्पासाठी आवश्यक परवानग्यांचे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश ठाणे महापालिकेला दिले.